# कसं असेल कोरोना नंतरच पर्यटन विश्व ?

कोरोना च्या ह्या अनपेक्षित हल्ल्या नंतर काहीसं घाबरलेलं, काहीसं काळजीत असलेलं, भविष्या विषयी साशंक असलेलं आमचं हे पर्यटन विश्व, तीन महिन्यात एव्हढं कोलमडून जाईल, असं जर मला कोणी जानेवारीमध्ये सांगितलं असतं, तर कदाचित, त्याला मी वेड्यातच काढलं असतं.

जानेवारीत सगळं कसं छान चाललं होतं. हवेत अमाप उत्साहं होता, नवीन वर्ष, काय नवीन घेऊन येणार, नवीन डेस्टिनेशनस कुठली, ऍडव्हर्टाइझमेंट कशा आणि कुठे करायच्या, जुन्या ग्राहकांना नवीन काय द्यायचं, मेळावे कसे असावेत, त्यांच्यात नावीन्य कसं आणावं, नवीन ठिकाणी नवीन फ्रँचायझी पार्टनर कसे घ्यावे, सेल्स आणि मार्केटिंग च्या टीम ला अपडेट्स द्यायचे आहेत, टूर मॅनेजर्सचं ट्रेनिंग घ्यायचं आहे, व्हेंडर्स च्या भेटीगाठी चाललेल्या आहेत, हॉटेल्स आणि एअर लाईन्स ची रीझर्वेशन्स, अशा अनेक गोष्टींचा ताळमेळ जमवत असतानाच्या, त्या एक्साइटमेंटची तुलना, एखाद्या उपवर सुंदरीच लग्न ठरल्या नंतर, ते लग्न होई पर्यंतच्या काळात, तिच्या मनात उसळणाऱ्या, त्या रोमांचक भावनांशीच होऊ शकतं आणि अचानक, एका बेसावध क्षणी, घात व्हावा, तसा, कोरोनाच्या ह्या महारोगानी, त्याची मिठी, हळू हळू आवळायला सुरवात केली होती. एखादा अनाकोंडा (अजगर) जसं त्याचं भक्ष हळू हळू गिळंकृत करेल, अगदी तसा. जेव्हा ह्या रोगाबद्दल पहिल्यांदा ऐकलं, तेव्हा तो, एव्हढं भयानक रूप धारण करेल आणि ते सुद्धा अशा अचाट वेगानी, ह्याची कोणालाच कल्पना नव्हती.

पण जेव्हा अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड, जपान, सिंगापूर सारख्या अती प्रगत देशांना, ज्यांच्याकडे संपूर्ण संसाधने, परिपूर्ण माहिती, अगणित संपत्ती, अत्याधुनिक हॉस्पिटल्स आणि उत्कृष्ट डॉक्टर्स असताना सुद्धा, ह्या रोगापुढे असहाय होऊन गुढघे टेकतांना पाहिलं, तेव्हा काळजाचा थरकाप उडाला. एव्हढे मोठे देश, एव्हढे ताकदवर नेते, एव्हढ्या मोठ्या कंपन्या, त्यांचे हुषार आणि अनुभवी संचालक सगळेच, कसे हतबल झाले होते. कुणालाच, काय करावे आणि कसे करावे हे कळत नव्हते. सगळेच एक मानसिक धक्का आणि बिथरलेल्या आवस्थेत सैरभैर झाले होते. आता अर्थ व्यवस्था वाचवावी की लोकांना वाचवावं अशा संभ्रमात नेते मंडळी बुडून गेली.

मग लॉक डाउन लागला. सर्व जग स्तब्ध झाले. प्रत्येक जण आपापल्या घरात, आपापल्या परीने परिस्थितीचा आढावा घेऊन, आपल्या पुढील वाटचालीची दिशा ठरवण्याचा प्रयत्न करू लागला. अचानक लागलेल्या लॉक डाउन मुळे, बऱ्याच कुटुंबांची ताटातूट सुद्धा झाली. कोणी कुठे, तर कोणी कुठे अडकले. ऑफिस, फॅक्टरी, दुकाने, विमानं प्रवास, रस्ते, गाड्या, ट्रेन सगळंच बंद झालं. घड्याळा बरोबर धावणारं हे जग, एकदम स्टॅच्यू दिल्यासारखं, जागेवरच उभं राहिलं. कोणाच्या नोकऱ्या गेल्या, तर कोणाच्या पगारात कपात झाली. गावी जाण्यासाठी हजारो मजदूर आपापल्या

# कसं असेल कोरोना नंतरच पर्यटन विश्व ?

कुटुंबासह शेकडो मैल चालत निघू लागले. डॉक्टर्स आणि नर्सेस च्या घरी चिंतेचं सावट पसरले. पोलीस आणि बँकर्स सुद्धा वॉरियर्स झाले. संक्रमित रुग्णांचे रोज वाढणारे आकडे आणि मृत्यूचं प्रमाण, हादरवून टाकणार होतं आणि ह्या सगळ्यामुळे अर्थव्यववस्थेचा तर पूर्ण बोजवाराच उडाला.

एखादं संकट आलं तर त्यातून बाहेर पडण्याचा एखादा कालावधी असतो, जसं भूकंप झाला किंवा वादळ आलं किंवा अतिरेकी हल्ला झाला, तर 2 ते 3 महिन्यात परत जनजीवन सामान्य होतं, परंतु ह्या कोरोना च्या संकटातून बाहेर पडण्याचा कालावधी, अतिशय अनिश्चित आहे, त्यामुळे वातावरणात एक प्रकारची भीती आणि दडपण आहे. कोणाला तरी भेटावसं वाटत, पण भेटायची सुद्धा, तितकीच भीती वाटते. आपल्या प्रत्येकाच्या संपूर्ण आयुष्यात, काहीही न करता, सलग 3 महिने, घरातच बसण्याचा असा हा प्रसंग पहिल्यांदाच आला आहे. घरकाम करायला बाई नाही, स्वयंपाक करायला बाई नाही, ड्रायव्हर ला सुट्टी. त्यामुळे पुरुष मंडळींना भांडी घासण्या पासून ते झाडू, पोछा, भाजी आणून, ती निवडून, स्वयंपाक करण्या पर्यंत, सगळ्याच कामात जुंपून घ्यायला लागलं.

सरकार पूर्णपणे गोंधळलेल्या आणि भ्रमिष्ट आवस्थेत, वेगवेगळ्या ऑर्डर्स काढून, लोकांच्या गोंधळात आणि भीतीमध्ये अजून भर घालायचं च काम करत आहे.

त्यातच भर म्हणून की काय निसर्ग नावाचं चक्री वादळ मोठ्ठा तडाखा देऊन, प्रचंड नुकसान करून गेलं आणि आता चिनी लोकांनी, युद्धजन्य परिस्थिती निर्माण करून, सामान्य लोकांच्या काळजीत आणखीनच भर घातली आहे.

तसं बघायला गेलं, तर पर्यटन हे प्रत्येकाच्या प्राध्यान्यांच्या (प्रायोरिटी) लिस्ट वर सगळ्यात खालच्या नंबर वर असतं. लोकं, घरासाठी कर्ज घेतात, मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज घेतात, वैद्यकीय आणीबाणीच्या दरम्यान कर्ज घेतात, पण पर्यटनासाठी कर्ज काढणारे नगण्यच. सर्व जबाबदाऱ्या संपल्या नंतर, आता पैसे आहेत आणि वेळ पण आहे, तर चला फिरून येऊ, असं म्हणणारेच जास्त. त्यातच आता ह्या कोरोनाच्या भीतीची भर पडली. कशाला सुखाचं आयुष्य दुःखात घालायचं ? काय फरक पडतो एक वर्षं नाही पर्यटन केलं तर ? असे विचार पर्यटकांच्या मनात येणं, अगदीच स्वाभाविक आहे. आज लिफ्ट च्या बटणाला सुद्धा हात लावायला लोकांना भीती वाटतेय, घरातली गृहिणी, घरात येणारी प्रत्येक वस्तू डेटॉल नी धुवून घेते आहे. आज घरातून बाहेर पडताना सुद्धा, मनावर एक प्रकारचं दडपण येतंय. अशा मानसिकते मधून बाहेर पडून, त्या लोकांना, पर्यटन कसं सुरक्षित आहे आणि आम्ही, तुमच्या

पर्यटनासाठी काय काय काळजी घेतं आहोत, हे त्यांच्यापर्यंत पोचवण्यात, जर पर्यटन व्यावसायिक, एअर लाईन, हॉटेल्स, कोच कंपन्या यशस्वी झाले, तरच पर्यटन पूर्व पदावर येण्यास मदत होईल.

लोकांच्या मनातील भीती काढणं, हेच आपलं सर्वोच्च प्राधान्य असलं पाहिजे. मग ही भीती कशी काढावी ? त्यासाठी पहिल्यांदा, लोकांना भीती काय आहे, ह्याचा अभ्यास करावा लागेल. प्रवासाला जर टॅक्सी, उबर किंवा ओला वापरली तर संक्रमण होईल का ? ड्रायव्हर संक्रमित असेल तर ? हॉटेल मध्ये जी रूम मला मिळणार आहे, त्यात जर एखादी संक्रमित व्यक्ती राहून गेली असेल तर ? ते लोकं बेड शीट, पिलो कव्हर बदलतील का ? संक्रमित लोकांनी वापरलेले टॉवेल माझ्या टॉवेल बरोबर वॉश केले असतील का ? माझी रूम, फूलं प्रूफ सॅनिटाईझ केलेली असेल का आणि कशी ? शेफ आणि किचन ची टीम, जे माझं जेवणं बनवणार आहेत, ते हेल्दी आणि निरोगी असतील का ?तिथलं स्थल दर्शन होणार का ? तिथे गर्दी असणार का ? तिथे गेल्यावर मला कोरोना ची लक्षणं दिसली, तर काय होईल ? एका गाडीत किती लोकं असतील ? वगैरे वगैरे.

पर्यटन, हा आजच्या आधुनिक जीवन शैलीचा एक अविभाज्य भाग झालेला आहे. कोरोना मुळे, आत्ता लोकांवर घरात बसण्याची सक्ती झाली आहे. 3 महिने घरात बसून कंटाळा आला आहे, मानसिक त्रास झाला आहे, पुढे काय होणार ह्या भितीनी मानसिक तणाव वाढला आहे, एक सामाजिक दडपण आलं आहे आणि ह्या सगळ्यावरचा रामबाण उपाय म्हणजे आवडत्या ठिकाणी पर्यटन करून, विरंगुळा मिळवणे. कोरोना वर वॅक्सीन बनवण्याचे सर्वच देश, त्यांचे नेते, सायंटिस्ट आणि डॉक्टर्स जीव तोडून प्रयत्न करीत आहेत, त्यामुळे त्याचा शोध लागणार आणि तोही पुढच्या आठ ते दहा महिन्यात हे नक्की. ते वॅक्सीन आलं, की लोकांच्या मनातली भीती नाहीशी होऊन, ते पहिल्या पेक्षा जास्त वेगानी पर्यटन करतील (रिव्हर्स डिनायल किंवा रिव्हेंज बाईंग इफेक्ट) त्यामुळे पर्यटन परत चालू होणार, ह्याबद्दल कोणाच्याही मनात शंका असण्याचं काहीच कारण नाही, पण ते कैंव्हा सुरु होणार, हे मात्र आत्ताच कोणीही सांगू शकणार नाही. पर्यटन विश्वातील काही अनुभवी लोकं म्हणतात, मार्च 2021 पासून पर्यटन परत मुळं पदावर येईल. परंतु मला असं वाटत की, आपल्या अर्थ व्यवस्थेची झालेली दैना, लोकांचे गेलेले जॉब्स, पगारात झालेली कटौती, कोरोना ची भीती, वातावरणात असलेलं दडपण, ह्या सगळ्यांचा, लोकांच्या खरेदी करण्याच्या मानसिकतेवर (बाईंग पॅटर्न वर ) 100% परिणाम होणार. मी स्वतः चांगले बूट आणि चांगल्या घड्याळांचा खूप शौकीन आहे. आज माझ्याकडे नायकी चे प्रत्येकी सोळा हजार रुपयांचे चार जोड बूट आहेत आणि मी दर सहा महिन्यांनी त्यात एका जोडाची भर घालतो. आज माझं बुटांचं कपाट गच्च भरलेलं आहे. परंतु आता मात्र कोरोना इफेक्ट मुळे मी ठरवलंय, की कपाटातील सर्व बूट फाटेपर्यंत, मी दुसरा बूट घेणार नाही आणि जेव्हा केव्हा घेईन, तेव्हा नायकी चा सोळा

# कसं असेल कोरोना नंतरच पर्यटन विश्व ?

हजारांचा बूट न घेता, साधा बाटा चा तीन हजारांचा घेणार. तसंच घड्याळाच्या बाबतीत. दर वर्षी महागडी आणि ब्रँडेड स्विस घड्याळं घेणारा मी, इथून पुढे अजिबात घड्याळं घेणार नाही, असं नक्की केलंय. इथून पुढे कुठलीही वस्तू घेताना, ती खरंच गरजेची आहे का (डिस्क्रिट बाईंग) हा विचार करूनच ती घेणार आणि त्यात सुद्धा, किंमती बरोबरच, परदेशी माल न घेणे, हा प्रमुख डिसायडिंग फॅक्टर असणार आहे. तर हा फरक प्रत्येक माणसाच्या बाईंग पॅटर्न वर पडेल, असं मला वाटतं.

मला मीडियाच्या बऱ्याच लोकांकडून वारंवार ही विचारणा होते आहे, की पर्यटन व्यवसाय परत कधी मुळं पदावर येईल ? पर्यटन सुरळीत व्हायची सुरवात सप्टेंबर 2021 ला होईल असा माझा अंदाज आहे. पहिले 20% लोकं, मार्च 2021 मध्ये व्यावसायिक कामांसाठी बाहेर पडतील. त्याच सुमारास साधारणपणे वॅक्सीन पण यावं, अशी अपेक्षा आहे. नंतर सप्टेंबर 2021 च्या सुमारास पहिले, साहसी प्रवृत्तीचे 40% लोकं बाहेर पडतील, त्यानंतर 20% लोक, जर वरील सर्वांचे अनुभव चांगले असतील आणि वॅक्सीन आलेलं असेल, तर मार्च 2022 ला बाहेर पडतील, असं मला वाटतं आणि शेवटचे 20% लोकं असा विचार करतील की, काय फरक पडतो, एखादं दोन वर्षं नाही पर्यटन केलं तर ?.........आणि असं जर घडलं, तर कुठलाही इनकम नसताना, टूर ऑपरेटर्स ना, अशा परिस्थितीला सामोरं जाण्याची, मानसिक आणि आर्थिक तयारी करून ठेवावी लागेल............ऑफिस चे खर्च, स्टाफचे पगार, बँकेचे हफ्ते आणि व्याज, पुढच दीड वर्षं आपण कसं देणार, ह्याची तरतूद आत्ताच करावी लागेल.

**मिलिंद बाबर**
**MD and Founder Chairman**
**मँगो हॉलिडेज**